या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | गुरुवार १३ जून २०२४ | अंक१८६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# अखेर सरकार बॅकफूटवर, मनोज जरांगे यांची ती मागणी मान्य होणार? ; देवेंद्र फडणवीस यांचं मोठं विधान काय?

## गुन्हे मागे घेण्याची मागणी मान्य?

मनोज जरांगे पाटील हे पुन्हा उपोषणाला बसले आहेत. त्यावर देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया दिली. मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू आहे त्याबाबत सरकार गंभीर असल्याचे ते म्हणाले. त्यांच्या मागण्यावर सरकार कारवाई करत आहे. मागच्या काळात आम्ही त्यांना केसेस परत घेण्याचे आश्वासन दिले होते. त्यावर प्रक्रिया सुरू आहे. त्यांची जी मागणी आहे त्याबाबत देखील सरकारने पहिले नोटिफिकेशन जारी केलेले आहे.त्यावर कार्यवाही सुरू असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. याप्रकरणात सरकार सकारात्मक असल्याचे मत त्यांनी मांडले.

## मनोज जरांगे यांच्या मागण्यांबाबत राज्य सरकार सकारात्मक दिसत आहे.



### ओबीसी समाजावर कुठलाही अन्याय नाही

मी ओबीसी नेत्यांशी चर्चा करत आहे. छगन भुजबळ यांच्याशी देखील चर्चा करून मी त्यांना समजावून सांगणार आहे. ज्यांच्याकडे कुणबी दाखला आहे त्यांना सर्टिफिकेट देता येतं. सर्वोच्च न्यायालयाने जे निकष ठरवून दिलेत त्यात बसणारच नोटिफिकेशन काढण्यात आले. ओबीसी समाजावर कुठलाही अन्याय होणार नाही. या प्रश्नी मार्ग काढण्याचा आमचा प्रयत्न आहे.

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीला मराठा आंदोलनाने जबरी हिसका दाखवला. लोकसभेत महाविकास आघाडीचा धुवा उडविण्याचे महायुतीचे मनसुबे हवेतच राहिले. महायुतीलाच मराठा आंदोलनाने मोठे भगदाड पाडले. मराठवाड्यातील हक्काचे मतदारसंघ पण भाजपला राखता आला नाही. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा आमरण उपोषणाचे हत्यार उपसले आहेत. पाच दिवस उलटूनही त्यांनी उपचारांना नकारघंटा दिली आहे. त्यामुळे राज्य सरकारची चिंता वाढली आहे. ते आता ताकही फुंकून पित आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी आपलं उपोषण मागे घेतलं पाहिजे असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. आरक्षणाबाबत सरकार नेहमीच सकारात्मक राहिले आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## संभाजी ब्रिगेड ला खासदार बजरंग सोनवणे कडून कौतुकाची थाप

**प्रतिनिधी/केज**

केज :संभाजी ब्रिगेड शिवसेना युती धर्मातून महविकास आघाडी चे उमेदवार शरदचंद्र पवार गटाचे लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना प्रचार यंत्रणा मधे अहोरात्र वेळ संभाजी ब्रिगेड ने दिला, गाव खेड्यात संभाजी ब्रिगेड च्या शाखा असून संभाजी ब्रिगेड ने गाव खेड्यात प्रचार करून जमेल ते सहकार्य बजरंग बप्पा निवडून यावेत या साठी केले. संभाजी ब्रिगेड चे जिल्हाध्यक्ष विजय दराडे यांनी निवडणुकी पूर्वी दिलेला शब्द खरा ठरला आज बजरंग सोनवणे बीड खासदार यांचा सत्कार संभाजी ब्रिगेड कडून करण्यात आला, बजरंग सोनवणे यांनी सर्वांचे आभार मानले. उपस्थित संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष विजय दराडे,किल्ले धारूर तालुका अध्यक्ष रमेश मोरे,जिल्हा सचिव अण्णासाहेब सोळंके,माजलगाव शहर प्रमुख परमेश्वर अडागळे,गणेश पाटेकर,रवी पवार सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते



## पैठण-पंढरपूर मार्गावरील चुंभळी घाटातील बिकट वाटेमुळे वाहनधारक त्रस्त पैठण-पाटोदा-पंढरपूर पालखी मार्गाची दुर्दशा

**प्रतिनिधी/पाटोदा :-**

पैठण-पंढरपूर या पालखी मार्ग रस्त्याचे गेल्या दहा वर्षापासून काम सुरू आहे. या रस्त्यावर पाटोदा तालुक्यात चुंबळी घाट रस्त्याची दुर्दशा झाली आहे.या रस्त्यावर पाऊस पडल्याने व नाली नसल्याने सर्व डोंगरातील माती व दगड रस्त्यावर जमा झाले आहेत. यामुळे हा रस्ता चढताना-उतरताना विद्यार्थी प्रवासी व वारकऱ्यांचे हाल होत आहेत.आषाढी एकादशी जवळ आल्याने या रस्त्यावर वारकरी प्रवासी यांची गर्दी आहे.या रस्त्यावरून संभाजीनगर,अहिल्यानगर,नाशिक, जळगाव येथील वारकरी सायकल, मोटरसायकल,जीपने,बैलगाडीने प्रवास करतात.वारकरी व शेतकऱ्यांना रस्त्यावर चालणे कठीण झाले आहे.रस्त्यावरचे दगड व खड्डे चुकविताना मोटरसायकल व कार वाकडे चालून विद्यार्थ्यांना वाहनधारकांना जीव मुठीत धरावा लागत आहे.या घाटात पाऊस झाल्याने डोंगरातील पाणी रस्त्यावरून वाहत आहे.रस्त्याला खड्डे व पडल्याने व खडी जमा झाल्याने मोटरसायकल घसरून पडतात तर लहान कार घाट चढताना हाल होत आहेत.प्रसंगी गाडी बंद पडून खड्ड्यात अडकतात.रस्ता अरुंद असल्याने सर्व वाहने अडकतात.तर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. या रस्त्याची नाली काढून हा घाट लवकर डांबरीकरण करावा.पैठण ते पंढरपूर हा रस्ता गंगामाई तीराजवळ बोधेगाव पासून खर्डा,धाराशिव जिल्ह्यापर्यंत पूल,खड्ड्यांची व नालींची दुरुस्ती करण्यात यावी.यामुळे वारकऱ्यांना व शेतकऱ्यांना हा रस्ता शेतात तालुक्याला,जिल्ह्याला जाण्यासाठी संत एकनाथ महाराज,श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनास श्री.माऊली, श्री क्षेत्र भगवानगड,श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड,मोहटादेवी, कुलस्वामिनी आई तुळजाभवानी दर्शनास सुलभ होऊन शासनास व त्या गुत्तेदारास आशिर्वाद लागतील. प्रसंगी अनेक विद्यार्थी या रस्त्यावरून शिक्षण मिळवतील.या रस्त्याचे काम त्वरित सुरू करावे अशी मागणी परिसरातील जनतेकडून होत आहे.



## ज्ञानराधाच्या ठेवीदारांचा पैशाचा मार्ग मोकळा आय सी आय सी आय बँकेकडे आला अधिकृत मेल

**बीड/प्रतिनिधी**

बीड: ज्ञानवराधा मल्टीस्टेटच्या ठेवीदारांसाठी पैशाचा मार्ग मोकळा झाला असून आयसीआयसीआय आणि संबंधित कंपनी यांच्यामध्ये कम्युनिकेशन झाल्याचा मेल नुकताच प्राप्त झाला आहे यामुळे येत्या दोन दिवसात ठेवीदारांना पैसे मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गेल्या काही महिन्यांपासून ज्ञानराधा मल्टीस्टेट अडचणीत सापडल्यामुळे ठेवीदारांचे पैसे देण्यास विलंब होत आहे.मात्र यातून मार्ग काढत ठेवीदारांसाठी पैशाची व्यवस्था केली असून गेल्या दोन दिवसांपासून यामध्ये मोठ्या प्रमाणावर हालचाली सुरू होत्या बुधवारी सायंकाळी संबंधित कंपनीकडून आयसीआयसीआय बँकेकडे मेल प्राप्त झाला असून तांत्रिक अडचणी दूर करून येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये ठेवीदारांच्या खात्यावर थेट पैसे देण्याची प्रक्रिया ज्ञानराधाच्या वतीने सुरू करण्यात येणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाले आहेत. ठेवीदारांनी काही दिवसांसाठी संयम ठेवून ज्ञानराधा मल्टीस्टेट च्या प्रशासनाला सहकार्य केल्यास ठेवीदारांचे पैसे मिळण्याचा मार्ग मोकळ्या होण्याची शक्यता आहे.

## शिक्षक नेते बबनराव पंडित यांचा वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा

बीड प्रतिनिधी - बहुजन शिक्षक संघटनेचे विभागीय अध्यक्ष बबनराव पंडित यांना वाढदिवसा निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन परिसर बीड येथे वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा.याप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते त्यामध्ये, बहुजन शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष विजयकुमार समुद्रे,आस संघटनेचे जिल्हाध्यक्ष करण राजपूत, उर्दू संघटनेचे शेख मणियार, महादेव विणकर, ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, मायकल वाघमारे, उद्योजक मनोज काळे, शिक्षक भरतीचे उद्योग खरात,मकरंद मराडे, पंचायत समितीचे वंजारे साहेब ,बर्डे पंढरी,आप्पा काळे.आदी शुभेच्छा देताना उपस्थित होते.



## लावण्याई पब्लिक स्कुलला भविष्यात चांगले दिवस येणार-दिपाली देशमूख




**परळी/प्रतिनिधी**

परळी वैजनाथ येथील शिक्षण क्षेत्रातील नावाजलेली लावण्याई पब्लिक स्कूलच्या २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आला. लावण्याई पब्लिक स्कूलचे प्रवेशोच्छुकचे उदघाटन शाळेच्या मार्गदर्शिका दिपाली देशमूख यांच्या हस्ते करण्यात आले आहे . यावेळी अध्यक्ष पत्रकार अनंत कुलकर्णी यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना दिपाली देशमुख यांनी लावण्याई पब्लिक स्कूल मधील शिक्षणेतर उपक्रमांचे व शाळेच्या गुणवत्तेचे कौतुक करून ही शाळा परळी शहरातील मध्यमवर्गीय पालकांसाठी आदर्श असल्याचे सांगितले. शाळेचे अध्यक्ष अनंत कुलकर्णी यांनी अत्यंत कष्टातून व धडपडीने या शाळेचा नावलौकिक वाढविण्यासाठी परळीतील पालकांच्या व समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्यातून वेगवेगळे उपक्रम राबविल्यामुळे शाळा ही व्यक्तिमत्व विकसनाचे व्यासपीठ बनली आहे. या शाळेतून घडणारा विद्यार्थी हा चौकस बुद्धीचा व समाजातील जबाबदार संवेदनशील नागरिक म्हणून निश्चितच पुढे येईल. शाळेच्या वेगवेगळ्या उपक्रमांची व नाविन्यपूर्ण कार्यक्रमांची माहिती समाज माध्यमातून होत असल्यामुळे आम्हाला शाळेचा दर्जा व विद्यार्थीकेंद्रित शिक्षण पद्धती आवडली असल्याचे त्यांनी सांगितले. सामाजिक पत्रकारितेच्या माध्यमातून अनंत कुलकर्णी यांनी शैक्षणिक क्षेत्रात अल्पावधीत चांगली प्रगती केलेली असून त्यांच्या धाडसाचे व या शाळेच्या विषयी असणारी आत्मीयता यांचे समाजाने कौतुक केले पाहिजे असे उद्गार काढले. ही शाळा भविष्यामध्ये परळीकरांच्या नावलौकिकास पात्र ठरणारी शाळा आहे. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका कविता विर्धे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात सहशिक्षिका नम्रता पांडे सुषमा देशमुख तुळशी मॅडम आदि उपस्थित होत्या.

# शेवगांव दरोड्यातील आरोपींची टोळी स्थानिक गुन्हे शाखेकडुन ४८ तासात जेरबंद १,८५,२००/- रुपये किंमतीचे मुद्देमाल जप्त.

**संतोष औताडे- अहमदनगर जिल्हा प्रतिनिधी**

प्रस्तुत बातमीची हकिगत अशी की, दिनांक 08 जुन 2024 रोजी फिर्यादी श्री. दिपक बाबासाहेब जरांगे रा. मारवाडी गल्ली, ता. शेवगांव हे कुटुंबियासह घरात झोपलेले असतांना अनोळखी 6 इसमांनी फिर्यादीचे घरात प्रवेश करुन चाकुचा धाक दाखवुन व लाथाबुक्यांनी मारहाण करुन घरातील 1,08,000/- रुपये किंमतीचे सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम बळजबरीने चोरुन नेले बाबत तसेच सातपुते गल्ली, ता. शेवगांव येथील श्री. निवृत्ती कारभारी वाणी वय 66, रा. सातपुते गल्ली, ता. शेवगांव यांचे घरात देखील चोरी करुन 1,40,000/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी नेले बाबत. शेवगांव पो.स्टे. गु.र.नं. 509/2024 भादविक 397, 342 प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर घटना घडल्यानंतर मा. श्री. राकेश ओला साहेब, पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांनी पोनि/श्री. दिनेश आहेर, स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर यांना वर नमुद गुन्हा उघडकीस आणणे बाबत आदेशित केले होते.

नमुद आदेशान्वये पोनि/श्री. दिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील पोउपनि/समाधान भाटेवाल व अंमलदार दत्तात्रय गव्हाणे, बापुसाहेब फोलाणे, संतोष लोढे, अतुल लोटके, देवेंद्र शेलार, विजय ठोंबरे, संदीप दरंदले, फुरकान शेख, किशोर शिरसाठ, मेघराज कोल्हे व संभाजी कोतकर अशांचे पथक नेमुन गुन्हे उघडकीस आणणे बाबत सुचना देवुन पथकास रवाना केले होते. सदर सुचना प्रमाणे दिनांक 10/06/2024 रोजी स्थागुशा पथकाने गुन्हा घडले ठिकाणी जावुन पाहणी केली असता घटना



ठिकाणी कोठेही सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने आरोपींची काहीएक माहिती मिळुन येत नव्हती. त्यामुळे पथाक शेवगांव परिसरात फिरुन रेकॉर्डवरील गुन्हेगारांची माहिती काढत असताना पथकास गुप्तबातमीदारा मार्फत इसम नामे अनिल ऊर्फ यासीनखाँ शिवाजी भोसले रा. गोंडेगांव, ता. नेवासा याने त्याचे इतर साथीदारांसह गुन्हा केला असुन तो सध्या त्याचे राहते घरी आहे आता गेल्यास मिळुन येईल अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने पथकाने लागलीच बातमीतील नमुद ठिकाणी जावुन पहाणी केली असता बातमीतील वर्णना प्रमाणे 2 संशयीत इसम उभे असलेले पथकास दिसले. त्यांना शिताफीने ताब्यात घेवुन पोलीस पथकाची ओळख सांगुन त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांची नावे 1) अनिल ऊर्फ यासीनखाँ शिवाजी भोसले वय 40 व 2) रोहन अनिल ऊर्फ यासीनखाँ भोसले वय 19, दोन्ही रा. गोंडेगांव, ता. शेवगांव असे असल्याचे सांगितले. त्यांचेकडे वर नमुद गुन्ह्याचे अनुषंगाने विचारपुस करता ताब्यातील संशयीतांनी त्यांचे इतर साथीदार नामे अमर दत्तु पवार, कृष्णा ऊर्फ सागर नारायण भोसले, दिपक इंदर भोसले सर्व रा. नेवासा फाटा, ता. नेवासा व सुनिल बाबाखाँ भोसले रा. गोंडेगांव, ता. नेवासा यांचे सोबत मिळुन 2-3 दिवसांपुर्वी शेवगांव परिसरात व 1 महिन्यापुर्वी चांदगांव उस्थळदुमाला, ता. नेवासा परिसरातील मेडीकल दुकान फोडुन रोख रक्कम व पल्सर मोटार सायकल चोरी केल्याचे सांगितल्याने आरोपींचे इतर साथीदारांचा शोध घेता आरोपी नामे 3) अमर दत्तु पवार वय 30, 4) कृष्णा ऊर्फ सागर नारायण भोसले वय 21 दोन्ही रा. नेवासा फाटा, ता. नेवासा, 5) सुनिल बाबाखाँ भोसले वय 21, रा. गोंडेगांव, ता. नेवासा हे मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेतले. आरोपी नामे 6) दिपक इंदर भोसले रा. नेवासा फाटा, ता. नेवासा (फरार) हा मिळुन आला नाही.

आरोपींनी सांगितल्या प्रमाणे जिल्हा गुन्हे अभिलेख पडताळणी करता खालील प्रमाणे -2 गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

| अ.क्र. | पोलीस स्टेशन | गु.र.नं. व कलम |
| --- | --- | --- |
| 1. | शेवगांव | 509/24 भादविक 397, 342 |
| 2. | नेवासा | 456/24 भादविक 457, 380, 379 |

ताब्यात घेतलेल्या आरोपींची अंगझडती घेता त्यांचे अंगझडतीत 1,85,200/- रुपये किंमतीचे 13 ग्रॅम वजनाचे विविध प्रकारचे दागिने, रोख रक्कम व 1 चाकु असा मुद्देमाल मिळुन आला आल्याने आरोपींना मुद्देमालासह ताब्यात घेवुन शेवगांव पोलीस स्टेशन गु.र.नं. 509/24 भादविक 397, 342 प्रमाणे दाखल गुन्ह्याचे तपासकामी शेवगांव पोलीस स्टेशन येथे हजर केले आहे. पुढील तपास शेवगांव पोलीस स्टेशन करीत आहे.

आरोपी नामे अनिल ऊर्फ यासीनखाँ शिवाजी भोसले हा सराईत गुन्हेगार असुन त्यांचे विरुध्द अहमदनगर जिल्ह्यातल दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, आर्म ॲक्ट व दुखापत असे गंभीर स्वरुपाचे एकुण 10 गुन्हे दाखल आहेत. आरोपी नामे अमर दत्तु पवार हा सराईत गुन्हेगार असुन त्यांचे विरुध्द अहमदनगर जिल्ह्यातल दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, चोरी, आर्म ॲक्ट, दुखापत असे गंभीर स्वरुपाचे एकुण 14 गुन्हे दाखल आहेत. आरोपी नामे रोहन अनिल ऊर्फ यासीनखाँ भोसले हा सराईत गुन्हेगार असुन त्यांचे विरुध्द अहमदनगर जिल्ह्यातल दरोड्याचा 1 गंभीर गुन्हा दाखल आहे. आरोपी नामे सुनिल बाबाखाँ भोसले हा सराईत गुन्हेगार असुन त्यांचे विरुध्द नेवासा पोलीस स्टेशन येथे चोरीचा 1 गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राकेश ओला साहेब. पोलीस अधीक्षक, अहमदनगर, मा. श्री. प्रशांत खैरे साहेब, अपर पोलीस अधीक्षक, अहमदनगर, मा. श्री. वैभव कलुभर्मे साहेब, अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर, मा. श्री. सुनिल पाटील साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी, शेवगांव विभाग यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेली आहे.

## कविता

### धुणं

काळं कातळ बसते
जळी पाय पसरुन
काच हिंदोळ पाणी
जाते वळसा घालून

नाही थकतभागत
मागे वळून पाहते
सागराला भेटण्यास
अविरत ती वाहते

सासू,सूना,मायलेकी
येती धुवायला धुणं
चाले जोरात भांडण
गाऱ्हाणही,उणंदुणं

धुते कपडा निर्मळ
सांगे मनगटी बळ
फेसाळल्या पाण्यासंग
जाई मनचाही मळ

निळं लुगड,धोतर
वाळू घाले वाळूवर
छोटेमोठे गोटे देई
ठेवूनिया तयावर

विझे पेटलेल मन
काळ्या शेवाळ्या जळानं
चाले घेऊनिया भार
माय नदीच्या बळानं

विद्या सरपाते

# अंबाजोगाईत संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्ता बैठकीचे आयोजन

## संभाजी ब्रिगेडची विचारधारा समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोंचवणार - जिल्हाध्यक्ष प्रविण ठोंबरे

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

आगामी काळात होवू घातलेल्या महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पुर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी शहरात संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्ता बैठकीचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या बैठकीत जिल्हाध्यक्ष प्रविण ठोंबरे यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी गोविंद हाके यांची तालुका कार्याध्यक्ष या पदावर नियुक्ती करण्यात आली. अंबाजोगाई येथे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ॲड.मनोज आखरे, प्रदेश महासचिव सौरभ खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या बैठकीत नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने जे ऐतिहासिक यश संपादन केले आहे. त्याचा आनंद साजरा करुन या विजयात आपला मोलाचा वाटा उचलणाऱ्या बीड जिल्ह्यातील सुज्ञ मतदारांचे आभार या बैठकीत मानण्यात आले. आगामी काळात होवू घातलेल्या महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पुर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी शहरात संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्ता बैठकीचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे तर यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष रामकिसन मस्के हे उपस्थित होते. बैठकीच्या सुरुवातीला राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन व प्रवर्तनवादी चळवळीतील सर्व महामानवांना अभिवादन करण्यात आले. यावेळी गोविंद हाके यांची तालुका कार्याध्यक्ष या पदावर नियुक्ती करण्यात आली. हाके यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष प्रविण ठोंबरे यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, संभाजी ब्रिगेड या पक्षाने उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेशी युती केली असल्याने आगामी काळात ही उबाठा शिवसेनेसोबत विधानसभेसह जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका, कृषी उत्पन्न बाजार समिती या सर्व स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवणार आहोत. त्यामुळे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी संभाजी ब्रिगेडची विचारधारा शहर, ग्रामीण भागासह समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवावी. बीड (पूर्व) जिल्ह्यात संभाजी ब्रिगेड वॉर्ड निहाय तयारी करीत आहे. लवकरच पक्षाचे वरिष्ठ नेते बीड (पूर्व) जिल्ह्याचा दौरा करुन संभाजी ब्रिगेडच्या संघटनात्मक बांधणीचा आढावा घेणार आहेत. बीड पूर्व मध्ये विद्यार्थी, महिला आणि दिव्यांग आघाडी अतिशय मजबूत आहे. त्यामुळे पुढील काळात नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांची कार्यकारिणी घोषित करून गावोगावी संभाजी ब्रिगेड्या शाखा उभारण्यात याव्यात. संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष



ॲड.मनोजदादा आखरे, प्रदेश महासचिव सौरभदादा खेडकर यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या ध्येयधोरणांसह संघटन अधिक मजबूत करावे. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व सामान्यांचे मुलभूत प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत. तरच आपल्या पक्षाला आगामी निवडणुकीत यश आल्याशिवाय राहणार नाही. संभाजी ब्रिगेड शंभर टक्के सामाजिक कार्य करतानाच शंभर टक्के राजकारण करण्यासाठी मैदानात उतरलेली संभाजी ब्रिगेड राजकारणाला नवा आयाम दिल्याशिवाय राहणार नाही. सर्वांना जोडणारा विचार म्हणजे संभाजी ब्रिगेड आहे असे मोलाचे मार्गदर्शन जिल्हाध्यक्ष प्रविण ठोंबरे यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले. यावेळी ठोंबरे यांनी ही बीड पूर्व मध्ये संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून व आपल्या सर्वांच्या सहकार्य व मार्गदर्शनाखाली अतिशय प्रभावीपणे कार्य करीत आहोत असे सांगितले. विद्यार्थी, महिला, दिव्यांग आघाडी सक्रिय आहे. शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, कामगार, सुशिक्षित बेरोजगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहोत. असे सांगून जिल्हाध्यक्ष ठोंबरे यांनी संभाजी ब्रिगेडची राजकीय भूमिका आणि संघटन बांधणी यासंदर्भात माहिती दिली. तर यावेळी बोलताना मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष रामकिसन मस्के यांनी सांगितले की, जिल्हाध्यक्ष प्रविण ठोंबरे यांनी मागील अनेक वर्षांपासून अतिशय चांगले कार्य करून मोठे संघटन उभे केले आहे. आपण चळवळीतून माणसं जोडा. मी व्याख्यान आणि प्रबोधनातून माणसं जोडत आहे. असे सांगून अतिशय उद्बोधक असे मार्गदर्शन करून पदाधिकारी व कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा दिली. या प्रसंगी कार्यकर्त्यांना पक्ष बांधणीसाठी येणाऱ्या ज्या अडचणी निर्माण होतात, त्या समस्या ऐकून त्यांचे निवारण केले. या बैठकीत १) या वर्षाभरात आगामी होणाऱ्या सर्व निवडणुका., २) नवीन पदाधिकाऱ्यांची निवडी., ३) शाखा बांधणे व बुथ बांधणी., ४) शेतकरी, विद्यार्थी आणि ५) स्थानिक प्रश्नांवर अतिशय सकारात्मक व मौलिक चर्चा करण्यात आली. या बैठकीस तालुकाध्यक्ष रवींद्र ढगे, जिल्हा सचिव नारायण मुळे, उपजिल्हाध्यक्ष परमेश्वर मिसाळ, तालुका कार्याध्यक्ष गोविंद हाके, शहराध्यक्ष सिद्राम यादव, दत्तात्रय गंगणे, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष केशव टेहरे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष अश्विनीताई यादव, महिला आघाडी तालुकाध्यक्ष सुनंदाताई लोखंडे, जमुनाताई सुरवसे, मुंजा बापू देवकते, पृथ्विराज सोनवणे यांचेसह संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बैठकीचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष रवींद्र ढगे यांनी केले. तर सुत्रसंचालन विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष केशव टेहरे यांनी केले. आणि उपस्थितांचे आभार महिला आघाडी जिल्हाध्यक्ष अश्विनीताई यादव यांनी मानले. बैठकीच्या यशस्वितेसाठी अंबाजोगाई तालुक्यासह बीड पूर्व भागातील संभाजी ब्रिगेडचे सर्व पदाधिकारी, विद्यार्थी, महिला, दिव्यांग आघाडी यांच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

# राज्यात आषाढी यात्रेसाठी एसटी महामंडळ ५ हजार विशेष बस सोडणार

**नाशिक/ प्रतिनिधी**

यंदा आषाढी एकादशीनिमित्त राज्यातील कोणतेही गावातून ४० अथवा त्यापेक्षा जास्त भाविक प्रवाशांना एकत्रित मागणी केल्यास त्यांना त्यांच्या गावातून थेट पंढरपूरला जाण्यासाठी एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी भाविकांनी जवळच्या आगारात संपर्क साधावा असे आव्हान एसटी महामंडळाने केले आहे .आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांसाठी एसटीने ५००० विशेष बस गाड्या सोडण्याची नियोजन केले असून दरवर्षीप्रमाणे यंदाही आषाढी एकादशीनिमित्त राज्यभरातून लाखो भाविक पंढरपूर येथे जातात, अनेक प्रवासी स्वतःची खाजगी वाहने, रेल्वे ,एसटी, अथवा विविध दिंडी सोबत चालत पंढरपूर घाटतात यंदा भाविकांना थेट स्वतःच्या गावातून पंढरपूर पर्यंत बस सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अर्थात या प्रवासात ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास देणारी अमृत ज्येष्ठ नागरिक योजना, महिलांना ५० टक्के तिकीट दरात सूट देणारी महिला सन्मान योजना, यासारख्या सर्व सवलती लागू असणार आहेत. मागील वर्षी एसटीने आषाढीनिमित्त ४२४५ विशेष बस गाड्या सोडल्या होत्या, त्यातून १८ लाख ३९ हजार ९३४ भाविकांची सुखरूप ने - आण एसटीने केली होती ,यावर्षी भाविक वाढण्याची दाट शक्यता असल्यामुळे ५००० गाड्यांचे नियोजन केले आहे.




## महाराष्ट्र राज्य सब ज्युनिअर मास्टर्स इक्युप्ड पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत अर्चना काळे यांना रौप्यपदक



संतोष औताडे -अहमदनगर प्रतिनिधी सविस्तर माहिती- महाराष्ट्र राज्य सब ज्युनिअर मास्टर्स इक्युप्ड पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत अर्चना काळे यांना रौप्यपदक पटकावले आहे.दिनांक 31 मे - 2 जुन 2024 या कालावधीत भोईवाडा कामगार मजदुर संघ मुंबई या ठिकाणी या स्पर्धा पार पडल्या या स्पर्धेत साधारणपणे 100 ते 200 खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या पावर लिफ्टिंग स्पर्धेत अहमदनगर जिल्हा पोलिस दलात कार्यरत असलेल्या महिला पोलीस हवालदार अर्चना काळे यांनी 57 किलो वजन गटात उल्लेखनीय कामगिरी करत दुतीय क्रमांक पटकावून रौप्यपदक मिळविले तसेच पोलिस हवालदार अरविंद भिंगार दिवे यांनी ही उत्कृष्ट कामगिरी केली. या दोन्ही खेळाडूंच्या यशाबद्दल मा.राकेश ओला साहेब पोलिस अधीक्षक अहमदनगर यांनी कौतुक केले आहे. तसेच दोन्ही खेळाडूंना नेस्ट लेव्हल फिटनेस जिमचे संचालक ओंकार गुंरम, विजय कनेडीया,श्री उमेश इंगावले, यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या उत्कृष्ट कामगिरी बद्दल दोन्ही खेळाडूंचे परिसरात तु अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

# छत्रपती संभाजी नगरच्या पालकमंत्री पदासाठी शिंदेसेने सोबत आता भाजपही स्पर्धेत

जिल्ह्याचे पालकमंत्री संदिपान भुमरे हे खासदार झाले आहेत त्यामुळे त्यांनी आमदारकीचा राजीनामा दिल्यावर त्यांचे रोहयो फलोउत्पादन व पालकमंत्री पद ही रिक्त होणार आहे त्या पदावर भरणी लागावी यासाठी शिंदे सेनेत स्पर्धा लागली आहे आमदार संजय शिरसाट यांचे नाव आघाडीवर असले तरी मंत्री अब्दुल सत्तार देखील दबाव तंत्र वाढविण्यात आहे त्यातच आता भाजप देखील स्पर्धेत उतरली आहे संजय केनेकर यांनी अतुल सावे यांच्याकडे पालकमंत्री पद द्यावे अशी मागणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्याकडे केली आहे त्यामुळे नवीनच वाद उफाळून येण्याची चिन्हे निर्माण झाली आहे संदिपान भुमरे यांना पश्चिम मतदार संघातून सर्वाधिक मताधिक्य देऊन आमदार संजय शिरसाठ हे मंत्रिमंडळ विस्तारात मंत्रीपद मिळण्यासही पालक मंत्री पदाचे दावेदार असल्याची जोरदार चर्चा आहे ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे जवळचे असल्याने गेल्या दोन वर्षात मंत्रिपदाची इच्छा असतानाही त्यांनी त्यावर पांघरून घातले होते मात्र आता राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार पावसाळी अधिवेशनापूर्वी होण्याची शक्यता आहे विस्तार झाला तर आमदार शिरसाट यांना मंत्रिमंडळात समावेश होईल अशी आशा आहे आगामी विधानसभा



निवडणुकीच्या तोंडावर किमान चार महिने का होईना थेट पालकमंत्री पदाची माळ गळ्यात पडली तर निवडणुकीत ताकद लावता येईल अशी सर्वांची इच्छा दिसत आहे मात्र मंत्री अब्दुल सत्तार यांनी



काँग्रेसची जवळीक वाढवल्याची जोरदार चर्चा आहे हे दबाव तंत्र आमदार शिरसाट यांना पालकमंत्री पदापासून दूर लोटू शकते त्यामुळे दोघांच्या स्पर्धेत शिरसाट यांना भुमरे यांच्या जागी मंत्री करून त्यांची नाराजी दूर केली जाईल तर सत्तार यांना पालकमंत्री पद देऊन आगामी विधानसभा निर्विघ्न पार पाडण्यासाठी हा तोडगा काढला जाऊ शकतो अशी देखील चर्चा आहे, अतुल सावेंकडे पालकमंत्री पद देण्याची मागणी छत्रपती संभाजीनगर च पालकमंत्री पद भाजपाला द्या अशी मागणी भाजपचे प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे



केली आहे मंत्री अतुल सावे यांना संभाजीनगरचे पालकमंत्री करावे आम्ही शिवसेनेचा खासदार निवडून आणला मुंबई यांच्या विजयात भाजपाचा सिंहाचा वाटा असल्यानं आता आम्हाला पालकमंत्री पद द्यायला हवं असं संजय केनेकर म्हणाले अतुल सावे जिल्ह्यासाठी आणि परिसरासाठी चांगल्या पद्धतीने काम करून विकास करू शकतील त्यामुळे त्यांना संधी मिळावी अशी आग्रही मागणी आहे,

## पहिल्याच दिवशी सोयगावात विद्यार्थ्यांना मिळणार गोड आहार---
## 1 लीच्या इयत्तेत 1505 विद्यार्थ्यांना मिळणार प्रवेश

शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी शनिवारी दि.१५)सोयगाव तालुक्यातील १२ हजार ५७४ विद्यार्थ्यांना गोड मेनू देण्यात येणार असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव यांनी दिली आहे दरम्यान सोयगाव तालुक्यातील १२० जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये या शैक्षणिक वर्षांत १५०५ विद्यार्थी पहिली वर्गाच्या प्रवेश घेणार आहे या विद्यार्थ्यांची शेतकऱ्यांच्या बैलजोडी ने गावभर मिरवणूक काढून स्वागत करण्यात येणार आहे

दरम्यान पहिल्याच दिवशी सोयगाव तालुक्यातील १३ हजार ५७४ विद्यार्थ्यांना ४६ हजार ८५३ मोफत पाठ्यपुस्तक ,वितरण करण्यात येणार आहे यामध्ये मराठी माध्यमाच्या ३७ हजार ५४७ सेमी इंग्रजी च्या ४३६० आणि उर्दू माध्यमाच्या २९४५ मोफत पाठ्य पुस्तक उपलब्ध करण्यात आली आहे त्यामुळे सोयगाव तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा प्रवेशोत्सव साठी सज्ज झालेल्या आहे....

# सात वर्षीय बालिकेची निर्गुण हत्या मानवतेला काळीमा फासणारी घटना

**जळगाव/प्रतिनिधी**

जामनेर तालुक्यातील केकतनिभोरा शिवारात चिंचखेडा बुद्रुक गावठाण परिसरात एका शेजारी रहात असलेल्या आदिवासी कुटुंबातील सहा वर्षीय अल्पवयीन बालिकेवर त्याच मुलीच्या घराशेजारी राहत असणाऱ्या धराधमाने अत्याचार करून जीवे ठार मारल्याची घटना आज संध्याकाळी सहा ते सात वाजेच्या सुमारास घडल्याची माहिती स्थानिक नागरीकांनी दिली. सविस्तर वृत्त असे कि जामनेर तालुक्यातील चिंचखेडा बुद्रुक या गावाशेजारी केकतनिभोरा शिवारात काहि आदिवासी कुटूंब रहातात.या कुटूबामधील एका घरातील सहा वर्षीय बालीकेला घरात एकटे पाहून शेजारी रहात असलेल्या पंचवीस वर्षीय धराधमाने दुकानावर नेवुन काहि खायला घेऊन देतो म्हणून घेवून गेला.व दुकानातुन तीला खायला घेवुन देवुन चिंचखेडा बुद्रुक येथील गावाजवळील असलेल्या केळीच्या बागेत नेले.असता मुलगी घरी नसल्याचे पाहून परीवाराने मुलीची शोधाशोध सुरु केली.

या घटनेची माहिती गावकऱ्यांना मिळताच गावकऱ्यांनी या बालिकेची शोध मोहीम सुरू केली. तसेच जामनेर पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक किरण शिंदे यांना माहिती दिली पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांना माहिती मिळताच त्यांनी तात्काळ आपल्या पथकासह सात वर्षीय बालिकेचा शोध घेतला असता मुलगी गावाजवळच असलेल्या केळीच्या बागेत मृत अवस्थेत आढळून आली. या सहावर्षीय बालकेवर एका धराधमाने अत्याचार करून तीला ठार करून धराधम फरार झाला असावा अशी चर्चा स्थानिक नागरीकांमध्ये दिसून येत आहे.

या घटनेमुळे संपुर्ण पंचक्रोशीत हळहळ व्यक्त केली केली जात असून धराधम मद्यधुंद अवस्थेत असल्याची चर्चा देखील काहि नागरीकांमध्ये दिसून आली तसेच फरार झालेल्या धराधमाचा शोध जामनेर पोलिस निरीक्षक व पथक करीत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.





# स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयात न्युरोसर्जनचा स्वतंत्र विभाग सुरू करण्यासाठी प्रस्ताव दाखल आमदार नमिताताई अक्षय मुंदडा यांचा पुढाकार

**प्रतिनिधी/अंबाजोगाई**

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात न्युरो सर्जन विभागाचा स्वतंत्र विभाग सुरू करण्यात यावा, यासाठी ३० खाटांचा स्वतंत्र वॉर्ड, आवश्यक मनुष्यबळ व स्वतंत्र शस्त्रक्रिया गृहाची निर्मिती करण्यात यावी असा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे पाठवण्यात आला आहे.

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात विविध अपघातात गंभीर जखमी झालेल्या तसेच हेड इंज्युरीने जखमी होण्याचे प्रमाण वाढले आहे. अशा रुग्णांना तात्काळ उपचार मिळण्यासाठी न्युरो सर्जरीचा विभाग तातडीने सुरु करणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ, यंत्रसामुग्री, स्वतंत्र वॉर्ड व स्वतंत्र शस्त्रक्रिया गृह विभाग निर्माण करणे आवश्यक आहे. सध्या या वैद्यकीय महाविद्यालयात सर्जरी विभागाच्या ३० खाटांचा न्यूरोसर्जन विभाग अस्तित्वात



असून सदरील बेड एम सी आय मानांकाच्या व्यतिरीक्त मंजूर करण्यात यावा व नवीन न्यूरोसर्जन विभागासाठी मनुष्यबळ निर्मिती एमसीआय मानंकानुसार मान्यता देण्यात यावी अशी मागणी आ.नमिताताई मुंदडा यांनी केली आहे. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालय विभागात स्वतंत्र न्युरो सर्जन विभाग सुरू करण्यासाठी स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाकडे रीतसर प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे.



अशी माहिती प्रभारी अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी दिली. स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयात न्युरो सर्जरी विभागाचा स्वतंत्र वॉर्ड सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या मनुष्यबळाच्या वेतनासाठी प्रति वर्षे २ कोटी १२ लाख ८७ हजार ३५७ रुपयांची तरतूद करण्यात यावी अशी मागणी या प्रस्तावात करण्यात आली आहे.

५६ लाखांचा प्रस्ताव न्युरोसर्जन विभागाचा स्वतंत्र शस्त्रक्रिया गृह निर्मितीसाठी यंत्रसामग्री व विविध उपकरणे खरेदी करण्यासाठी या प्रस्तावात ४२ कोटी ५६ लाख ६ हजार २४९ रुपयांचा प्रस्ताव दाखल करण्यात आला असुन आ.नमिताताई मुंदडा ह्या प्रयत्न करत असल्याची माहिती प्रभारी अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी दिली.

# ततकालीन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त आर.एम. शिंदे यांनी पालकमंत्र्यांना अंधारात ठेवून नियमबाह्य १०७ घरकुलास घेतली मंजुरी

**प्रतिनिधी/बीड**

ततत्कालीन बीड जिल्ह्यातील समाज कल्याण सहाय्यक आयुक्त आर.एम.शिंदे यांच्या कार्यकाळात ग्रामीण भागातील रमाई घरकुल योजनेतील जिल्ह्याला उद्दिष्ट असलेले प्रस्ताव आचारसंहितेच्या अगोदर पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन मंजूर करण्यात आले. परंतु बीड तालुक्यातील ग्रामीण उद्दिष्ट व्यतिरिक्त 107 रमाई घरकुल योजनेची पालकमंत्री यांची दिशाभूल करून मंजुरी घेतली. पंचायत समिती बीड मार्फत मंजुरीसाठी कोणताही प्रस्ताव आलेला नसतानाही अंधारात ठेऊन दिशाभूल करून मंजुरी घेतली. रमाई घरकुल योजनेचे प्रस्ताव ग्रामपंचायत मार्फत ग्रामसभेत मंजूर करून सदर प्रस्ताव पंचायत समितीला पाठवले जातात त्यानंतर पंचायत समिती त्या प्रस्तावाची छाननी करते. त्यानंतर हे प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी पंचायत समिती कडून समाज कल्याण सहाय्यक आयुक्त बीड पाठवले जातात. व जिल्ह्याचे पालकमंत्री या कमिटीचे अध्यक्ष असतात परंतु आर.एम. शिंदे व नितिन राठोड यांनी बीड पंचायत समिती मार्फत प्रस्ताव दाखल नसतानाही.स्वतःचे आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी बोगस लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी मिळवून दिली. मागासवर्गीय प्रवर्ग सोडून इतर लाभार्थी असण्याची शक्यता आहे. याबाबत बीड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी अनिरुद्ध सानप यांनी 15 मे 2024 रोजी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण बीड यांना पत्र लिहिले असून 107 लाभार्थ्यांना कुठल्या कागदपत्राच्या आधारे अथवा या कार्यामार्फत विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करण्यात आलेले नसतानाही त्यांच्या नावे घरकुल मंजूर केलेले आहे. यामध्ये मोठा आर्थिक गौरव्याहार झाल्याची शक्यता दिसून येत आहे. सदरील लाभार्थ्यांचे प्रस्ताव ग्रामपंचायत मार्फत पंचायत समिती ला प्राप्त नव्हते. व या कार्यालया मार्फत आपल्याकडे प्रस्ताव सादर न करता थेट घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी दिली आहे. त्यामुळे त्या लाभार्थ्यां संदर्भात पुढील कार्यवाही याबाबत वरिष्ठ पातळीवर पत्र व्यवहार केला आहे. याची प्रत त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड व प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बीड यांना गट विकास अधिकारी अनिरुद्ध सानप यांनी दिली आहे. अशाप्रकारे आर.एम.शिंदे यांनी त्यांच्या कार्यकाळात अनेक प्रकारच्या अनियमित्ता केल्या आहेत. या प्रकरणात त्यांची विभागीय चौकशी देखील चालू आहे. सदरील प्रकारात त्यांच्यावर योग्य ती कारवाई कधी होईल याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

## नवीन अभ्यास केंद्र सुरु करण्यासाठी प्रस्ताव दाखल करण्याचे आवाहन

चिस्तिया महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे बी. ए.मराठी माध्यम व उर्दू माध्यमातील तसेच एम.ए.मराठी,एम.ए.इतिहास आणि एम.ए.उर्दू अभ्यास क्रमाचे प्रवेश सूरू झाले आहेत.प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन सुरु झालेली आहे.तसेच नवीन अभ्यास केंद्र सुरू करण्याचे आवाहन संभाजी नगर येथील विभागीय केंद्राचे संचालक डॉक्टर रमेश शेकोकर यांनी केले आहे चिस्तीया महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सय्यादा अर्शिया कादरी आणि केंद्र समन्वयक डॉ. गणी पटेल यांनी प्रवेश घेण्याचे आवाहन केले आहे.प्रवेश मर्यादित स्वरूपात आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
गुरुवार १३ जून २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# मनोज जरांगे पाटील यांचा मुख्यमंत्र्यांच्या ओएसडीवर गंभीर आरोप; आता तर आमचे लोक दिल्लीपर्यंत नेऊ लागले आहेत

मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ओएसडीवर गंभीर आरोप केले आहेत. मुख्यमंत्र्यांचा ओएसडी मराठा आरक्षणाच्या आंदोलनातील काही जणांना दिल्लीत घेऊन जात असल्याचा आरोप मनोज जरांगे यांनी केला आहे. “काहीजण तिकडे प्रसिद्धी मिळत नाही म्हणून ते इकडे आंदोलन करायचं म्हणत आहेत. त्यांचे काय गाव जळाले आहेत का? मुद्दाम तुम्हाला जाती-तेढ निर्माण करायचा आहे. ओबीसी नेते स्वत:ला प्रगल्भ विचारायचे म्हणून घेतात आणि इकडे बसणार आणि तिकडे बसणार म्हणतात. जिथे तेढ निर्माण होईल तिथे तुम्ही बसणार का? शाहू, फुले, आंबेडकरांचे नाव घेऊन नुसते भाषण ठोकतात. हे सरकारचं षडयंत्र आहे. मुख्यमंत्र्याला आम्ही चांगलं मानतो. शिंदे साहेबांना आजपर्यंत आम्ही चांगलं मानतो. मुख्यमंत्र्यांच्या ओएसडीने अजून काय नवीन षडयंत्र रचले काय माहिती? आमच्या बांधवांना ते दिल्लीला घेऊन जाऊ लागलेत. आता तर आमचे लोक दिल्लीपर्यंत नेऊ लागलेत. काय षड्यंत्र रचले ते थोड्या दिवसात उघडे पडेल”, असं मनोज जरांगे म्हणाले. “मुख्यमंत्र्यांना मी आजही चांगलं मानतो. मात्र त्यांचे ओएसडी लोकांना घेऊन दिल्लीला पळत आहेत. मुंबई संपली. आता दिल्लीला पळत आहे. काय साचा बनवून आणला असेल? मला बदनाम करण्यासाठी किंवा मराठ्यांना बदनाम करण्यासाठी? हे षड्यंत्र सरकार करत आहे. काय सरकार, काय ओएसडी? मुख्यमंत्र्याना आम्ही खूप चांगलं मानतो. मला सरकारने 100 टक्के खेळवले. विमानतळावर सीसीटीव्ही अमुक सर्व आहे. कोण गेलं, कोण उतरलं ते कळतं. मुख्यमंत्र्यांना बदनाम करण्याचं ओएसडीचे काम आहे. वेळोवेळी असंच होत राहिले तर समाज तरी किती दिवस गप्प बसणार आहे?” असा सवाल मनोज जरांगे यांनी केला.



## ‘सगेसोयरेच्या व्याख्येप्रमाणे अध्यादेशाची अंमलबजावणी करा’

“उपोषण असे कसे स्थगित होईल, त्यांनी त्यांचे लोक इथे पाठवून जाहीर करावं की हे किती दिवसात करतील. 57 लाख नोंदी मिळाल्यात. त्याच्या आधारे कायदा किती दिवसात पारित करतील, किती दिवसात आंदोलकांवरील गुन्हे मागे घेतील? हे स्पष्ट करायला हवं. उपोषण स्थगित होईल. पण किती दिवसात करणार आहेत? का लगेच करणार आहेत? असे अनेक प्रश्न आहेत. आम्ही दिलेल्या सगेसोयरेच्या व्याख्येप्रमाणे अध्यादेशाची अंमलबजावणी व्हावी”, अशी भूमिका मनोज जरांगे यांनी मांडली.

## राजकीय,सामाजीक व्यक्तिविरुद्ध आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यावर होणार कारवाई
## जिल्हा पोलीस प्रशासनाचे याकडे बारकाईने लक्ष शांतता कमिटीच्या बैठकीत केले आवाहन


**केज प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुक २०२४ चा निकाल दि.०४/०६/२०२४ रोजी घोषीत झाल्यानंतर बीड जिल्हयात काही समाज कंठक सोशल मिडीयावर काही विशिष्ठ समाजाविषयी आरोपी प्रत्यारोप व उमेव्दारे यांचे विषयी अक्षेपार्ह पोस्ट लिहुन प्रसारीत करुन बीड जिल्हयात शांतता भंग करुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. बीड जिल्हा पोलीस दल हे सर्व प्रकारचे सोशल मिडीयाचे हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवुन आहे. असे अक्षेपार्ह पोस्ट टाकणारे व्यक्तीवर तात्काळ गुन्हे दाखल करुन कारवाई करणे सुरु आहे. तसेच सदरच्या पोस्टला लाईक करणारे, त्यास सहमती दर्शवनारे किंवा सदरच्या पोस्ट व्हायरल करणारे व्यक्तींवर देखील प्रतिबंधक कार्यवाही करत आहोत. बीड जिल्हा पोलीस प्रशासना तर्फे वेळोवेळी पोलीस ठाणे स्तरावर व गाव पातळीवर शांतता कमेटीच्या बैठकी घेऊन बीड जिल्हयाची शांतता भंग करु नये व जातीय सलोखा राखणे बाबत वारंवार सर्व जाती जमातीचे लोकांना अवाहन करण्यात आले आहे. आज दि. १२/०६/२०२४ रोजी पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे केज यांनी पोलीस ठाणे केज येथे सर्व जाती धर्माचे प्रतिष्ठीत नागरीकांची तसेच राजकीय व्यक्तीची शांतता समितीची बैठक घेऊन त्यांना शांतते बाबत अवाहन केलेले आहे. त्यामुळे कोणत्याही विशिष्ठ जातीच्या किंवा धर्माच्या प्रमुख राजकीय, समाजीक व्यक्तीं विरूध्द कोणत्याही प्रकारे अक्षेपार्ह लेखन करुन लोकांच्या भावना दुखावणार नाहीत याची दक्षता घ्यावी. सदर बाबत मा.जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय बीड, सायबर पोलीस ठाणे बीड यांचेकडुन अशा लोकांवर बीड जिल्हा पोलीस दल बारकाईने लक्ष ठेवुन असुन अशा समाज कंठकाविरूध्द कायदेशी कार्यवाही करण्यात येईल याबाबत सोशल मिडीयवर प्रसिध्दी देण्यात आलेली आहे. तसेच अशा लोकांवर यापुर्वी कार्यवाही देखील करण्यात आलेली आहे. तरी यापुढे कोणीही सोशल मिडीयवर (व्हॉटसअप, फेसबुक, इन्स्टाग्राम, स्नॅपचॅट इत्यादीवर) कोणीही अक्षेपार्ह पोस्ट प्रसारीत करणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच कोणतेही धरणे, आंदोलन, उपोषण, साखळी उपोषण, रस्ता रोको व गाव/शहर बंद करणार नाहीत. ज्यामुळे शासकीय नोकरदार, शालेय विद्यार्थी व शेतकरी यांना आडचण होईल असे कोणतेही कृत्य करणार नाही याची दक्षता घ्यावी. असे अवाहन बीड जिल्हा पोलीस दला तर्फे करण्यात येत आहे.



### बीड जिल्ह्याचे सिंघम खासदार बजरंग सोनवणे यांचे “ जरांगे पाटील यांच्या उपोषणाची दखल घेण्यासंदर्भाने राज्यापालांना पत्र

मराठा आरक्षणाच्या संदर्भात मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण सुरू आहे त्यांची आज रोजी प्रकृती खालवलेले आहे त्या अनुषंगाने बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित सिंघम खासदार बजरंग सोनवणे यांनी महामहीम राज्यपालांना पत्र पाठवले आहे सदरील पत्रामध्ये असे म्हटले आहे कि, आपणास नम्र निवेदन करण्यात येते की, श्री. मनोज जरांगे पाटील हे ८ जून २०२४ पासून आंतरवाली-सराटी जि. जालना या ठिकाणी आमरण उपोषणास बसले आहेत. त्यांनी गेली पाच दिवसापासून अन्न, पाणी त्याग केलेला आहे. त्यामुळे त्यांची प्रकृती खालावत चाललेली आहे. श्री. मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या विषयी महाराष्ट्र राज्य शासनाची भूमिका उदासिनतेची दिसून येत आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाने वेळीच दखल न घेतल्यास महाराष्ट्र राज्यात गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी या प्रकरणी आपण स्वत: लक्ष घालुन श्री. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाची दखल घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाला सूचित करावे या आशयाचे पत्र पाठवलेले आहे.



# पेरणीसाठी किती पावसाची आवश्यकता. पावसाचा खंड पडल्यास काय उपाययोजना कराव्या.

राज्याच्या सर्वच भागांमध्ये मान्सूनचा पाऊस टप्प्याटप्प्याने हजेरी लावत आहे. जूनच्या मध्यापर्यंत राज्याच्या सर्वच भागांमध्ये पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान राज्याच्या काही ठिकाणी जोरदार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे पेरणी करावी कि नाही असा प्रश्न शेतकऱ्यांना पडत आहे. शेतकऱ्यांनी खात्रीच्या ओलीतावरच आणि सिंचनाची सोय असेल तरच पेरणी करण्याचा निर्णय घ्यावा असा सल्ला शेती अभ्यासक पल्लवी चिंचवडे यांनी दिला आहे. १५ जून पर्यंत चांगला पाऊस झाल्यानंतरच आणि जमिनीमध्ये ३ ते ४ इंच खोलीपर्यंत ओलावा असेल तरच चांगल्या जमिनीत शेतकरी पेरणी करण्याचा निर्णय घेऊ शकतात. या ओलाव्यामुळे पावसाचा थोडा खंड पडला तरी पिक किमान ३० ते ४० दिवस तग धरून राहते. राज्यात काही भागामध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला आहे त्यामुळे मशागत आणि पेरणीच्या कामाला वेग आला आहे. तर काही भागात चांगला पाऊस ठिकठिकाणी होत असला तरी शेतकऱ्यांनी किमान ७५ ते १०० मिलीमीटर पाऊस पडल्यानंतरच पेरणी करणे फायदेशीर राहिलं अन्यथा दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर ओढवू शकत आणि त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान देखील होतं त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणी करताना अजिबात घाई करू नये. बऱ्याच वेळा सरासरी प्रमाणे पाऊस पडला तरी पिक वाढीच्या संवेदनशील काळात पावसाचे एक ते दोन खंड पडतात. हे पावसाचे खंड जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात पडतात. पावसाचा खंड पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेत, वाढीच्या अवस्थेत किंवा पिक पक्व होण्याच्या अवस्थेत देखील पडू शकतो. अनेकवेळा पेरणी वेळेवर होते पिकांची वाढहि समाधानकारक असते परंतु पावसाच्या खंड पडला आणि पिकांचे व्यवस्थापन योग्यरीतीने न केल्याने नुकसान होते म्हणून योग्य उपाययोजना हाती घेणे आवश्यक असते.

पेरणी झाल्यावर आणि पीक उगवून आल्यावर पावसाचा खंड पडल्यास विहीर, बोअरवेल, शेततळे या संरक्षित पाणी साठ्यातून ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धतीचा वापर करून पिकांना पाणी द्यावे. तर कोळपणी करून पिकांच्या खोडाशी मातीची भर लावावी, जमिनीवर पडलेल्या भेगा बुजवल्या जाव्यात जेणेकरून ओलावा टिकून राहिल.पिकांमध्ये



असलेलं तन पाणी, जागा आणि अन्नद्रव्ये यांच्यासाठी नेहमीच स्पर्धा करत असते. त्यामुळे पिकातील तन काढून टाकणे हे अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे पिकाच्या वाढीस लागणारे पाणी आणि अन्नद्रव्य पिकाला योग्य मिळाल्याने पिकाची वाढ होत राहील. पिकांची उगवण झाल्यानंतर साधारणपणे पिकांच्या ४ ते ६ ओळींनंतर कोळप्याच्या सहाय्याने सऱ्या काढाव्यात जेणेकरून सुरुवातीला पडलेला पाऊस या सऱ्यांमध्ये साठविला जाऊन पाण्याची उपलब्धता वाढते, उत्पादनात १५ ते २० टक्क्यांनी वाढ होऊ शकते. याच बरोबर उशिरा झालेला पाऊस या सऱ्यांमध्ये साठविला जाऊन आगामी रब्बी पिकांसाठी ओलावा टिकवून ठेवता येतो. पिकांच्या दोन ओळींमध्ये आच्छादनाचा वापर करावा.तर जमिनीत ओलावा टिकून राहण्यासाठी सेंद्रिय जीवाणू आणि खतांचा वापर केल्यास जमिनीचा भुसभुशीतपणा वाढून पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते. फळबागेमध्ये झाडांच्या मृत फांद्या काढून टाकाव्यात आणि एक टक्का बोर्डोमिश्रणाचा वापर करावा. तर जमिनीतील बाष्पीभवन कमी करण्यासाठी उसामध्ये पाचटाचे आच्छादन करावे. आच्छादन केल्यानंतर ते चांगले कुजवले जाईल यासाठी उपयायोजना करणे आवश्यक आहे.फळपिकांमध्ये बाष्पीभवन कमी करण्यासाठी ७ टक्के केवोलीनची फवारणी पानांवर करावी. भात पिकामध्ये शेताभोवती बांध बंदिस्ती करून पावसाचे पाणी शेताबाहेर जाणार नाही याची पुरेपूर काळजी घ्यावी जेणेकरून पावसाच्या खंड कालावधी मध्ये पाणी जमिनीमध्ये जिरून अधिक काळ ओलावा टिकून राहतो. यासोबतच शेताबाहेर चर काढून त्यात अधिकचे पाणी जिरवावे जेणेकरून शेतामध्ये ओल टिकून राहिल.तर शेतामध्ये जास्तीच पाणी साठवून राहणार नाही यासाठी पाणी बाहेर काढण्यासाठी योग्य व्यवस्था करावी जेणेकरून शेतात पाणी साचून राहिल्याने पिकाचे नुकसान होणार नाही. पिक वाढीच्या सुरुवातीच्या काळात पावसाचा खंड पडला आणि क्षेत्र कमी असेल तर त्या ठिकाणी पंपाचा वापर करून पाण्याची फवारणी करून देखील पिकं जागवता येतात. कोकणात भाताचे रोप उगवून आल्यानंतर पावसाचा खंड पडल्यास अनेक शेतकरी याच पद्धतीचा अवलंब करतात त्यामुळे जमिनीमध्ये योग्य पोल झाल्यासच शेतकऱ्यांनी पेरणी करावी आणि पावसाचा खंड पडल्यावर या उपायोजना कराव्यात असा सल्ला शेती अभ्यासक पल्लवी चिंचवडे यांनी दिला आहे

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com